International Research Journal ISSN-0975-3486 RNI : RAJBIL 01488 VOL. I * ISSUE—3

शोध पत्र- हिन्दी

Dec.-09—Jan.-2010

# भारतातील घटते स्त्री-पुरुष प्रमाण-मुक्ताईनगर तालुक्याना क्षेत्रिय अभ्यास

* डॉ. अशोक खाचणे ** डॉ. अणणसाहेब जी.डी. बेंडाळे

*-** व्याख्याता, महिला महाविद्यालय, जळगांव. (महा.)

**भारतातील घटते स्त्री - पुरूष प्रमाण आणि त्याचे परिणाम : आर्थिक, सामाजिक व मानसशास्त्रीय** या विषयावर होणाऱ्या राज्यस्तरीय चर्चासत्राचे निमित्त साधुन मुक्ताईनगर तालुक्यातील स्त्री - पुरूष प्रमाणाचा क्षेत्रिय अभ्यास करण्याची मला संधी मिळाली. त्यानिमित्तने हा शोध निबंध.

मुक्ताईनगर तालुका हा जळगांव जिल्ह्यातील एक शेती प्रधान परंतु मागासलेला तालुका म्हणून संबोधला जातो. शेती हाच एकमेव व्यवसाय असल्यामुळे संशोधनासाठी निवड केलेली सर्व कुटुंब हे शेतकरी / शेतमजूर आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार मुक्ताईनगर तालुक्यात एकूण ७९ गावे होती. यापैकी ३०% म्हणजे जवळ जवळ २५ गावाची क्षेत्रिय संशोधनासाठी यादृच्छिक (Random) नमुना निवड पध्दतीने निवड केली. क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या २५ गावामधून प्रत्येकी ६ अशा एकुण १५० कुटुंबाची निवड नमुना म्हणून केली ही निवड करीत असतांना सुध्दा यादृच्छिक (Random) नमुना निवड तंत्राचा वापर केला. प्रस्तुत शोधनिबंधातील बहुतांशी माहिती ही प्रश्नावलीच्या आधारे गाळा करण्यात आलेली असून अशा माहितीला व आकडेवारीला प्रश्नावलीचा आधार आहे. काही तक्त्यांमध्ये गटागटाने माहिती दिलेली आहे या प्रत्येक गटाची कमाल मर्यादा त्या त्या गटात समाविष्ट केलेली आहे.

वरील तक्ता क्र. १ मध्ये क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या कुटुंबातील स्त्री व पुरूषांची संख्या दिलेली आहे. या माहितीवरून पुढील गोष्टी लक्षात येतात.

क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या कुटुंबातील एकुण सभासद संख्या ९५३ असून त्यापैकी ५०७ (५३.२०%) पुरूष तर ४४६ (४६.८०%) स्त्रिया आहेत. म्हणजेच पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या १२.०३% कमी आहे. तसेच निवडलेल्या लोकसंख्येत दरहजार पुरूषांमागे जवळ जवळ ८८० स्त्रिया आहेत. म्हणजेच स्त्री - पुरूष प्रमाण ८८० आहे. २००१ च्या जनगणनेनुसार भारतात हेच प्रमाण ९३३ तर महाराष्ट्रात ९२२ आहे. अर्थ असाकी संशोधनासाठी निवड केलेल्या कुटुंबांमध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या तुनेत खुपच कमी आहे व ही बाब आर्थिक व सामाजिक दृष्टया अतिशय धोकेदाय आहे.

**तक्ता क्रमांक - १ निवड केलेल्या कुटुंबातील स्त्री - पुरूष प्रमाणाचा आकृतीबंध**

| अ.नं. | लिंग | संख्या | शेकडा प्रमाण | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | पुरूष | ५०७ | ५३.२० | |
| २ | स्त्रिया | ४४६ | ४६.८० | ८८० |
| | एकुण | ९५३ | १००.०० | |

वरील तक्ता क्र. २ मध्ये क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या लोकसंख्येची वयोगटानुसार विभागणी केलेली आहे. या तक्त्यावरून पुढील बाबी लक्षात येतात.

१) ०-१४ वयोगटात निवड केलेल्या एकुण लोकसंख्येपैकी एकुण २६८ (२८.१२%) लोकसंख्या सामावलेली आहे. यापैकी १५०(५५.९७%) पुरूष (मुले) तर ११८ (४४.०३%) स्त्रिया (मुली) आहेत. मुलांच्या संख्येपेक्षा मुलींची संख्या जवळ जवळ २१.३३% कमी आहे असे दिसते. तसेच दरहजार मुलांमागे फक्त ७८६ मुली आहेत. म्हणजेच या वयोगटात स्त्री - पुरूष प्रमाण ७८६ आहे. २)

१५-६० वयोगटात निवड केलेल्या एकुण लोकसंख्येपैकी एकुण ६०९ (६३.९०%) लोकसंख्य सामावलेली आहे. यापैकी ३१२(५१.२३%) पुरूष तर २९७ (४८.७७%) स्त्रिया आहेत. म्हणजेच या कर्त्या लोकसंख्येच्या गटात पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या जवळ जवळ ४.८१% कमी आहे. तसेच दरहजार कर्त्या पुरूषांमागे स्त्रियांची संख्या ९५१ आहे असे दिसते. म्हणजे या वयोगटात स्त्री-पुरूष प्रमाण

का आहे या विषयी निवड केलेल्या कुटुंबांच्या प्रमुखांशी चर्चा केली असता पुढील कारणे दिसून आलीत.

१) मुक्ताईनगर तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण खुपच कमी आहे. तसेच समाजमनावर अंधश्रध्देचा मोठा पगडा आहे. त्यामुळे विवाहीत स्त्रिला आलेल्या बहुसंख्य आजारांवर शास्त्रीय पध्दतीने उपचार न करता दैवशक्ती व अंधश्रध्दा यांचा आधार घेवून उपचार केला जातो. परिणामी विवाहीत स्त्रियांचा मृत्युचा दर संशोधन क्षेत्रात जास्त आढळतो.

२) मुक्ताईनगर तालुका आर्थिक व सामाजिक दृष्टया मागासलेला असल्यामुळे या तालुक्यातअजूनही बालविवाहाचे प्रमाण जास्त आहे. विशेषतः विवाहसमयी स्त्रियांचे वय पुरूषांच्या वयाच्या तुलनेत खुपच कमी असते असे आढळून आले. परिणामी स्त्री बालविवाहामुळे कमी वयातच माता बनतात. तसेच बालविवाहामुळे प्रजनन काळ वाढतो. परिणामी जास्त अपत्यांना जन्म दिला जातो व अशा स्त्रिया जास्त बाळंतपणामुळे कमी वयातच थकतात व त्यांना तुलनेने लवकर मृत्यु येतो.

३) आर्थिक मागासलेपणामुळे बालमृत्युचे प्रमाण खुप जास्त आहे असे दिसते व म्हणून म्हातारपणापर्यंत एक तरी मुल टिकावे याकरीता जास्त मुलांना जन्म दिला जातो. परिणामी वारंवार प्रसुतीमुळे स्त्रिया शारिरीक दृष्टया क्षिण होत जातात व त्या लवकरच मृत्युला कवटाळतात. बऱ्याच स्त्रिया बाळंतपणातच पुरेश्या वैद्यकिय सोयी अभावी मरण पावतात.

**क)** ६१ व च्यावर या वयोगटात संशोधनासाठी निवड केलेल्या लोकसंख्येचा फार अल्प ७६ (७.९७%) भाग सामावलेला दिसतो. या वृध्द लोकसंख्येच्या गटात दर हजार पुरूषांच्या मागे स्त्रियांचे प्रमाण फक्त ६८९ आहे. हे प्रमाण कमी असणाऱ्या कारणांचा शोध घेतला असता पुढील कारणे दिसून येतात.

१) पुरूष प्रधान समाजरचनेत वृध्दावस्थेत पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांकडे फार दुर्लक्ष केले जाते. त्यांना हाल अपेष्टांचे जीवन जगावे लागते. त्यामुळे पुरूषांच्या तुलनेत त्या लवकर मरण पावतात.

२) स्त्रिया वृध्दासमवेत असतांना सुनांकडून होणाऱ्या छळामुळे

९५१ आहे. ३) ६१ व च्यावर वयोगटात निवड केलेल्या एकुण लोकसंख्येपैकी एकुण ७६ (७.७९%) लोकसंख्या सामावलेली आहे. यापैकी ४५(५९.२१%) पुरूष तर ३१ (४०.७९%) स्त्रिया आहेत. म्हणजेच या वयोगटातील लोकसंख्येत पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या जवळ जवळ ३१.११% कमी आहे. तसेच या वयोगटात दरहजार पुरूषांच्या मागे स्त्रियांची संख्या फक्त ६८९ आहे. म्हणजेच स्त्री-पुरूष प्रमाण ६८९ आहे.

**तक्ता क्रमांक - २ निवड केलेल्या लोकसंख्येतील वयोगटानुसार स्त्री - पुरूष प्रमाण**

| वयोगट | एकुण लोकसंख्या | पुरूष | स्त्रिया | दरहजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ० - १४ | २६८ | १५०(५५.९७) | ११८(४४.०३) | ७८६ |
| १५ - ६० | ६०९ | ३१२(५१.२३) | २९७(४०.७७) | ९५१ |
| ६१ च्या वर | ७६ | ४५(५९.२१) | ३१(४०.७९) | ६८९ |
| एकुण | ९५३ | ५०७ | ४४६ | ८८० |

**टिपः-कंसातील आकडे त्या त्या वयोगटातील एकुण लोकसंख्येशी % प्रमाण दर्शवितात.**

वरील सर्व माहितीवरून पुढील काही महत्वाचे निष्कर्ष काढता येतात. **अ)** ०-१४ या वयोगटात दरहजार मुलांमागे मुलींचे प्रमाण फारच कमी आहे. यामागील पुढील कारणे संशोधनातून पुढे आलीत. १) अलिकडे **एक दाम्पत्य एक अपत्य** या सुत्राचा अंगिकार बहुतेक नवविवाहीत जोडप्यांकडून केला जातांना दिसतो. मुलगा हा वंशाचा दिवा / म्हातारपणाचा आधार म्हणून मुलीपेक्षा मुलाला प्राधान्य दिले जाते व अतिशय नियोजनबध्द पध्दतीने मुलालाच जन्म दिला जातो. परिणामी मुलांपेक्षा मुलींची संख्या कमी आहे. २) मुलगी लहान असतांना तिच्या संगोपनाची फारशी काळजी घेतली जात नाही. तसेच तिला परक्याचे धन समजून दुय्यम वागणूक दिली जाते. आजारपणात मुलींची मुलांएवढी काळजी घेतली जात नाही. इ. कारणांमुळे संशोधन क्षेत्रात मुलींच्या मृत्युचे प्रमाण मुलांच्या तुलनेत जास्त दिसते.

३)मागासलेपणामुळे लैंगीक शोषण, हुंडाबळी, सामाजीक सुरक्षीततेचा अभाव, लग्नाचा फारमोठा खर्च इ. घटक प्रभावी ठरून मुलींपेक्षा मुलांना जन्म देण्यास संशोधन क्षेत्रात प्राधान्य दिले जाते असे दिसते.

**ब)** १५-६० या वयोगटात संशोधनासाठी निवड केलेल्या लोकसंख्येचा फार मोठा (६३.९०%) भाग सामावलेला दिसतो. या कर्त्या लोकसंख्येच्या गटात दरहजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९५१ एवढे आहे. या वयोगटातील स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी

वृध्द स्त्रीया शरीराने व मनाने पुरूषांपेक्षा लवकर थकतात. त्यांची रोगप्रतिकार शक्ती कमी होवून त्या लवकर मरण पावतात. याउलट वृध्द पुरूष संपूर्ण संपत्तीचा मालक असल्यामुळे संपत्तीचा जास्तीत जास्त वाटा आपणास मिळावा याकरीता कुटुंबातील सर्वच त्याची देखभाल करतात परिणामी पुरूषांचे आयुष्य वाढते.

**ड)** क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या लोकसंख्येतील अविवाहीतांचा एक गट (या गटात लहान बालकांपासून तर सर्व अविवाहीत स्त्री-पुरूषांचा समावेश केला आहे) केल्यास असे दिसते की, एकूण ९५३ लोकसंख्येपैकी या गटात ४०३ (४२.२८%) लोकसंख्या सामावलेले आहे. यापैकी २३०(५७.०७%) पुरूष, तर १७३(४२.९३%) स्त्रिया आहेत. म्हणजेच अविवाहीत पुरूषांच्या तुलनेत अविवाहीत स्त्रियांचे प्रमाण २४.७८% कमी आहे असे दिसते. या गटातील स्त्री-पुरूष प्रमाण फक्त ७५२ आहे असे दिसते. व हे समाज व्यवस्थेच्या दृष्टीकोनातून खूपच धोकेदायक आहे. कारण जर या वयोगटातील सर्वच्या सर्व स्त्री व पुरूषांनी तरूणपणी लग्न करावयाचे म्हटल्यास हजार पुरूषांपैकी फक्त ७५२ पुरूषांनाच वधु मिळतील उर्वरीत २४८ पुरूषांना वधु न मिळाल्यामुळे जन्मभर अविवाहीत राहावे लागेल. परिणामी हे लोक सामाजिक गुन्हेगारीकडे वळलेले दिसतील.

या वयोगटात अविवाहीत पुरुषांचे प्रमाण अविवाहीत स्त्रियांपेक्षा जास्त का, यांच्या कारणापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला असता असे लक्षात आले की, मुक्ताईनगर तालुक्यात बरेच अविवाहीत पुरूष आहेत (विशेषतः हिंदू धर्मिय) की ते विवाहास तर तयार आहेत पण मुळातच समाजात मुलींची संख्या कमी असल्यामुळे त्यांना वधूच मिळत नाही म्हणून ते अजूनही अविवाहीत आहेत. तसेच अंर्तधर्मीय विवाहास घरातील वडिलधारी मंडळी मान्यता देत नाही. परिणामी या गटात अविवाहीत पुरूषांची संख्या खुप जास्त आहे.

**तक्ता क्रमांक - ३ निवड केलेल्या लोकसंख्येचे वयोगटानुसार स्त्री - पुरूष प्रमाण**

| धर्म | लोकसंख्या | पुरूष | स्त्रिया | स्त्री-पुरूष प्रमाण |
|---|---|---|---|---|
| हिंदू | ७४४(७८.०७) | ३९९(७८.७०) | ३३५(७७.३५) | ८६४ |
| बौध्द | १२६(१३.२३) | ६५(१२.८२) | ६१(१३.६८) | ९३८ |
| मुस्लिम | ८३(८.७०) | ४३(८.४८) | ४०(८.९७) | ९३० |
| एकुण | ९५३(१००) | ५०७(१००) | ४४६ (१००) | ८८० |

**टिप :- कंसातील आकडे एकूणाशी % प्रमाण दर्शवितात.**

वरील तक्ता क्रमांक ३ मध्ये क्षेत्रिय संशोधनकरिता निवड केलेल्या लोकसंख्येंचे धर्मानुसार स्त्री - पुरुष प्रमाण दिलेले आहे या माहितीवरुन पुढील निष्कर्ष निघतात. १) क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेली लोकसंख्या हिंदू, बौध्द व मुस्लिम या तीन धर्मातील आहे. २) क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या एकुण लोकसंख्येपैकी ७४४(७८.०७%) लोकसंख्या हिंदू धर्मीय आहे. यापैकी ३९९ पुरूष, तर ३४५ स्त्रिया आहेत. स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या प्रमाणापेक्षा १३.५३% कमी आहे. दरहजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण फक्त ८६४ आहे. २००१ च्या जनगणनेनुसार हेच प्रमाण भारतात ९३१ आहे तर महाराष्ट्र राज्यात ९२३ आहे. अर्थ असा की क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या हिंदू धर्मीयांमधील दरहजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण सुध्दा खुपच कमी आहे.

३) क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या एकुण लोकसंख्येपैकी १२६ (१३.२२%) लोक बौध्द धर्मीय असून यापैकी ६५ पुरूष तर ६१ स्त्रिया आहेत. स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत ६.१५% कमी आहे. बौध्द धर्मियांमध्ये दरहजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९३८ आहे असे दिसते. २००१ च्या जनगणनेनुसार हेच प्रमाण भारतात ९५३ तर महाराष्ट्रात ९६१ आहे. याचा अर्थ असा की संशोधन क्षेत्रातील बौध्द धर्मियांचे सध्दा स्त्री-पुरूष प्रमाण कमीच आहे.

४) क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या एकुण लोकसंख्येपैकी ८३(८.७०%) लोक मुस्लिम धर्मिय असून यापैकी ४३ पुरूष तर ४० स्त्रिया आहेत. स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत ६.९८% कमी आहे. मुस्लिम धर्मीयांमध्ये दरहजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९३० आहे असे दिसते. २००१ च्या जनगणनेनुसार हेच प्रमाण भारतात ९३६ तर महाराष्ट्रात ८८९ आहे. महाराष्ट्र राज्याचा विचार करता संशोधन क्षेत्रात हे प्रमाण बरेच समाधानकारक आहे असे दिसते.

वरील माहितीवरून हे लक्षात येते की, क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या एकूण लोकसंख्येत हिंदू धर्मियांचे प्रमाण सर्वात जास्त आहे मात्र हिंदू धर्मियांमध्ये स्त्री-पुरूष प्रमाण सर्वात कमी (८६४) आहे व याचे कारण म्हणजे मुक्ताईनगर तालुक्यात बौध्द व मुस्लिम धर्मियांपेक्षा हिंदू धर्मियांची आर्थिक स्थिती चांगली असून लहान कुटुंब असण्याकडे त्यांचा कल आहे. परिणामी बहुतेक जोडपे अलिकडे **एक दाम्पत्य एक अपत्य** याप्रमाणे वागतांना दिसतात व त्यामुळे होणारे अपत्य हे मुलगाच असावा असा आग्रह धरला जातो. व त्याकरीता गर्भजल परिक्षणाचा मार्ग बहुतांशी हिंदू कुटुंब वापरतांना दिसतात. तुलनेने बौध्द व मुस्लिम धर्मिय आर्थिक दृष्टया बरेच मागासलेले, शिक्षणाचा अभाव, समाज मनावरील धर्माचा पगडा इ. कारणांमुळे अजूनही मर्यादीत कुटुंब ही संकल्पना या धर्मीयांमध्ये रूढ झालेली दिसत नाही. परिणामी मुलगा / मुलगी असा भेद न करता ते एका पेक्षा जास्त अपत्यांना जन्माला घालतांना दिसतात व

त्यामुळे या दोन्ही धर्मियांमध्ये स्त्री - पुरूष प्रमाणाचा समतोल नैसर्गीक रित्या बराच साधलेला दिसतो. हिंदू धर्मियांच्या तुलनेत या दोन्ही धर्मियांमधील स्त्री - पुरूष प्रमाण खुप जास्त आहे असे दिसते.

क्षेत्रिय संशोधनात असे आढळून आले की, ज्यांना फक्त दोनच अपत्य आहे असे ३० जोडपे आहेत. त्यांच्या एकुण अपत्यांची संख्या ६० असून त्यापैकी ३२ मुले व २८ मुली आहेत. यामधील स्त्री - पुरूष प्रमाणाचा विचार केला असता ते ८७५ आहे असे दिसते.

तसेच एकच अपत्य असणारे २१ दांम्पत्य असून त्यांच्या अपत्यांची संख्या २१ आहे. यापैकी १५ मुले व ६ मुली आहेत. यामधील स्त्री-पुरूष प्रमाण फक्त ४०० आहे असे दिसते. याचे कारण म्हणजे एकच अपत्य जन्माला घालावयाचे हे एकदा निश्‍चित झाल्यानंतर पती व पत्नी दोघांचाही आग्रह मुलालाच जन्म देण्याचा असतो. कारण मुलगा हा वंशाचा दिवा मानला जातो व म्हातारपणीचा आधार असतो. तर मोक्ष प्राप्तीचा मार्ग ही असतो व म्हणून अतिशय नियोजन बध्द रितीने फक्त मुलालाच जन्म दिला जातो. अशा कुटुंबात मुलीचा जन्म झालाच तर तो फक्त अपघातानेच होतो असे दिसते. परिणामी मुलींची संख्या प्रचंड घटलेली दिसते. दरहजार पुरूषांमागे फक्त ४०० स्त्रीया ही अतिशय भितीदायक स्थिती आहे जर हे असेच चालत राहिले तर भविष्यात स्त्रियांची संख्या पुरूषांच्या तुलनेत प्रचंड घटेल व मोठया सामाजिक व आर्थिक समस्या निर्माण होतील.

संशोधनावरून असे दिसते की, एका जोडप्याला असलेल्या अपत्यांची संख्या जेवढी जास्त तेवढे त्यामधील स्त्री-पुरूष प्रमाण जास्त तर जेवढी अपत्यांची संख्या कमी तेवढीच स्त्री-पुरूष प्रमाण कमी दिसून येते. चीन सरकारने एकच अपत्यांचा कायदा केलेला असल्यामुळे अलीकडे चीन मध्ये मुलींची संख्या वेगाने घटत असून तेथे अनेक सामाजिक समस्या भेडसावत आहेत असे दिसते व म्हणून मर्यादीत कुटुंब ही योजना राबवितांना गर्भजल परिक्षणावर आधी कडक बंदी आणावी जेणेकरून मुलींचे जन्माआधी होणारे खून थांबतील व त्यांची संख्या वाढेल.

**उपाययोजना** :-१. मुक्ताईनगर तालुक्यात साक्षरतेच्या प्रमाणात वाढ करावी या करीता साक्षरता अभियानासारखे कार्यक्रम सक्तीने राबवावे. २. तालुक्याच्या आर्थिक मागासलेपणामुळे अंधश्रध्दा मोठया प्रमाणात आढळून येते. ती दूर करण्यासाठी व्यापक पातळीवर प्रयत्न व्हावेत. ३. मुक्ताईनगर तालुक्यात पुरूष प्रधान समाज रचना आहे. अशा पुरूषप्रधान समाज रचनेत स्त्रीला गौण स्थान दिले जाते म्हणून या समाजात स्त्री-पुरूष समानता पटवून देणारे कार्यक्रम राबविले पाहिजेत. ४. विवाह समयी दिला व घेतला जाणारा हुंडा स्त्रीयांच्या छळास कारणीभूत ठरत आहे म्हणून हुंडा विरोधी कायद्याची अंमलबजावणी काटेकोर व्हावी व तसेच या जोडीला सामाजिक प्रबोधनाद्वारे हि प्रथा नष्ट करण्यासाठी प्रयत्न करावेत. ५. मुलीच्या संख्येत वाढ करण्यासाठी गर्भजल चाचण्यांवर बंदी आणावी यासाठी सामाजिक संस्थांनी पुढे येवून नवदाम्पत्यांना प्रबोधन करावे. ६. एकात्म बाल विकास सेवा योजना युध्द पातळीवर राबवावी. ७. मुलींना रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणावर उपलब्ध करून द्याव्यात. ८. बालविवाह पध्दत बंद करण्यासाठी समाज जागृती करावी व यासाठी गावातील प्रतिष्ठीत व्यक्तिंनी (सरपंच पोलीस पाटील इ.) पुढाकार घ्यावयास पाहिजे.

## सन्दर्भ ग्रन्थ

१. सामाजिक संशोधन पध्दती - डॉ. भांडारकर पु.ल. २. इकॉनॉमिक पॉलिटीकल विकली - सप्टें.-ऑक्टों.२००४ ३. जळगांव जिल्हा सेन्सस हँडबुक २००१ ४. प्रश्नावली.